**पुढील सरतपास फिर्यादीतर्फे श्री. आर. व्ही. कुलकर्णी वकील यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

४. (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १८/१ कडील कागद दाखविला) आता मला दाखविलेला कागद हा आरोपीने आम्हाला दिलेला धनादेश आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. (सदर धनादेशास **निशाणी २०** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/२ कडील कागद दाखविले.) आता मला दाखविलेले कागद हा धनादेश परतीचा मेमो आहे. त्यावर संबंधीत बॅकेचा शिक्का आहे व शाखा प्रबंधकाची सही आहे. (सदर धनादेश परतीचे मेमोला **निशाणी २१** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/३ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेला कागद हा फिर्यादीने संस्थेने आरोपीला दिलेल्या नोटीसची स्थळ प्रत आहे. त्यावर पुर्वीच्या शाखा प्रबंधकाची व फिर्यादी संस्थेच्या वकीलांची सही आहे. सदर नोटीसमधील मजकुर बरोबर आहे. (नोटीसच्या स्थळ प्रतिस **निशाणी २२** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/४ कडील कागद दाखविले.) आता मला दाखविलेले कागद हा पोस्टाची पावती आहे. (सदर पावतीस **निशाणी २३** देण्यात येते.)(फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/५ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविला कागद हा आरोपीला पाठविलेल्या नोटीसचा बंद लखोटा आहे. (सदर लखोटा न्यायालयासमक्ष उघडण्यात आला). सदर लखोटयामध्ये मुळ नोटीसवर पुर्वीचे शाखा प्रबंधक व फिर्यादी संस्थेच्या वकिलांची सही आहे. त्या सहया मी ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर नोटीस लखोट्यास त्यातील मुळ नोटीससह **निशाणी २४** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १८/२ व १८/३ कडील कागद दाखविला) आता मला दाखविलेला कागद हा आरोपीच्या खात्याचा उतारा व प्रमाणपत्र आहे. त्यावर संस्थेचा शिक्का व माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर खाते उतारा व प्रमाणपत्रास अनुक्रमे **निशाणी २५ व २६** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १८/४ कडील कागद दाखविला) मला दिलेल्या अधिकार पत्राची सत्यप्रत आहे. त्यावर सत्यपत्र म्हणून संस्थेचा शिक्का व माझी सही आहे. (सदर ठरावाच्या प्रतीस **निशाणी २७** देण्यात येते.)

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.जी. कुलकर्णी यांच्यामार्फेत**

आरोपीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN

Digitally signed by BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Date: 2024.06.11 11:06:30 +0530

दि. १०/०६/२०२४.
अकोट

भानुप्रताप ब. चौहान
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग